# प्रेसनोट

दि.२८/०२/२०२५

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | श्रीगोंदा पो.स्टे., जि.अहिल्यानगर गुरनं.१६७/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | संतोष सुधाकर फलके, वय–४० वर्ष, पोलीस हवालदार, बक्कल नं.३६१, वर्ग–३, नेमणुक श्रीगोंदा पोलीस स्टेशन, जि.अहिल्यानगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ७,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ७,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार व त्यांचे इतर १३ नातेवाईकांचे विरोधात श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं.१३१/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३२४(४), १८९(२), १९१(१), १९१(२), १९० प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयाचा तपास श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार संतोष फलके हे करीत आहेत. तक्रारदार यांनी दि.२७/२/२०२५ रोजी पोलीस हवालदार फलके यांची भेट घेतली असता पोलीस हवालदार फलके यांनी तक्रारदार यांचेकडे गुन्हयाचे तपासात मदत करण्याकरीता १४ जणांचे मिळुन २०,०००/– रूपये लाचेची मागणी केलेबाबतची तक्रार प्राप्त झाली होती.<br>सदर लाच मागणी तक्रारीच्या अनुषंगाने दि.२७/२/२०२५ रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली. लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक फलके यांनी तक्रारदार व त्यांचे इतर १३ नातेवाईक यांच्या विरोधात दाखल असलेल्या गुन्हयामध्ये मदत करण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे पंचासमक्ष १४ जणांचे प्रत्येकी पाचशे रूपये या प्रमाणे ७,०००/– रूपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले. त्यानुसार लोकसेवक फलके यांचे विरूध्द श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे लाचेचा सापळा आयोजित केला असता लोकसेवक फलके यांनी तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष ७०००/– रुपये लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(अजित त्रिपुटे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहिल्यानगर